वाचले:-1.म.उप आयुक्त (आरोग्य व पोषण ),महिला व बाल विकास ,आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक मबाविआ/एबाविसेयो/का-2/3506/2011, दिनांक 02.09.2011

2.म.उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, नवीन प्रशासन भवन, 3 रा मजला मंत्रालय, मुंबई 32, यांचे शासन निर्णय क्रं.एबावि-2005/प्र.क्रं.233/का-5,दिनांक 05.04.2006.

3.केंद्र शासनाचे पत्र क्रं. एफ.नं.CD-II-17-1/2017 CD III दि. 15.05.2017

4. म.आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना मुंबई यांचे पत्र क्रं.एबाविसेयो/आवपो/का-2/2124/2017 दि.15.07.2017

5. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाक) जि.प.जळगांव यांचे पत्र क्रं.बाक/एसए/आरआर/384/2017 दिनांक 18.08.2017

6. या कार्यालयाचे आदेश क्रं.पुरवठा/हालचाल/WBNP/2तिमाही/जिप-बाक/ई-टपाल/2017/9/40/8594 दि. 24.08.2017

********

क्रं.पुरवठा/हालचाल/WBNP/जिप-बाक/2तीमाही/ईटपाल/2017/~~9/40~~/39640
जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय,
दिनांक 1 .09.2017

**आ दे श**

केंद्र शासनाचे गहु आधारित पोषण आहार योजनेंअतर्गत (WBNP) **माहे जुलै 2017 ते सप्टेंबर 17 या दुसऱ्या तिमाहीसाठी** गहू/तांदुळ चे नियतन म. आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपोद्घातातील क्रं. 4 नुसार जळगांव जिल्हयातील **एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत (Wheat Based Nutrition Programme) असलेल्या जिल्हा परिषदेच्या बचतगट/अंगणवाडी साठी** लाभार्थी संख्या **154605** विचारात घेवून बी.पी.एल दराचा **गहू 450 क्विं.** व **तांदुळ 930** क्विं. मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाक) जि.प.जळगांव यांनी उपोद्घातातील क्रं. 5 नुसार या कार्यालयात धान्याची मागणी सादर केली आहे.

या कार्यालयाने भारतीय अन्नमहामंडळाकडे WBNP जिल्हा परिषद व भुसावळ नागरी प्रकल्पाचे एकत्रित धान्य खरेदीसाठी **रक्कम रु. 4,21,700/- (अक्षरी चार लक्ष एकवीस हजार सातशे मात्र) धनादेश क्रं. 513476 दि. 28.08.2017** नुसार जमा केले आहेत. म. व्यवस्थापक,भारतीय खाद्य निगम महामंडळ मनमाड यांचेकडून खालीलप्रमाणे धान्याचे डि ओ दि.25.09.2017 अखेर उचल करण्यासाठी प्राप्त झाले आहेत.

| डी ओ क्रं | दिनांक | योजना | धान्य मे. टन मध्ये | गोदामाचे नांव |
|---|---|---|---|---|
| 3589 | 29.08.2017 | WBNP जि.प प्रकल्प गहू | 45.00 | MSWC जळगांव |
| 3590 | 29.08.2017 | WBNP जि.प प्रकल्प तांदुळ | 93.00 | MSWC जळगांव |

मी जिल्हाधिकारी जळगांव या आदेशाव्दारे खालील प्रमाणे तालुकानिहाय प्रकल्पामधील बचतगट/महिला मंडळांना/महिला संस्था चे अंगणवाडीतील 3 ते 6 वयोगटातील लाभार्थीकरिता पाककृती खीचडी व हलवा वाटप साठी तालुकानिहाय **माहे जुलै 2017 ते सप्टेंबर 17 या दुसऱ्या तिमाहिसाठी** बीपीएल दराचे धान्य वितरणास मंजूरी देत आहे. तालुकानिहाय बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो. यांचे मागणी पत्रानुसार तहसिलदार यांनी स्वस्त धान्य दुकानामार्फत अंगणवाडी/बचतगटांना धान्याचे वितरण करावे.

| अ.क्रं. | तालुका | प्रकल्पाचे नांव | ३ ते ६ वयोगटालील लाभार्थी मार्च १७, मा.प्र.अ.नुसार | मंजूर धान्य (क्वि.मध्ये ) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | तादुळ | गहू |
| १ | अमळनेर | अमळनेर | ८६४० | ५२ | २५ |
| २ | भडगांव | भडगांव | ८७४९ | ५३ | २५ |
| ३ | भुसावळ | भुसावळ | ६९०२ | ४२ | २० |
| ४ | बोदवड | बोदवड | ४५८६ | २८ | १३ |
| ५ | चाळीसगांव | चाळीसगांव-१ | ४२९६ | २६ | १२ |
| ६ | | चाळीसगांव-२ | १०३४२ | ६२ | ३० |
| ७ | चोपडा | चोपडा-१ | ४८३१ | २९ | १४ |
| ८ | | चोपडा-२ | ९१७० | ५५ | २७ |
| ९ | धरणगांव | धरणगांव | ६३५५ | ३८ | १८ |
| १० | एरंडोल | एरंडोल | ७६३० | ४६ | २२ |
| ११ | जळगांव | जळगांव | ११२८८ | ६८ | ३३ |
| १२ | जामनेर | जामनेर-१ | ७७५६ | ४७ | २३ |
| १३ | | जामनेर-२ | ११७०७ | ७० | ३४ |
| १४ | मुक्ताईनगर | मुक्ताईनगर | ८४८७ | ५१ | २५ |
| १५ | पाचोरा | पाचोरा | १२२८९ | ७४ | ३६ |
| १६ | पारोळा | पारोळा | ८३१५ | ५० | २४ |
| १७ | रावेर | रावेर-१ | ६१०५ | ३६ | १८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | | रावेर-२ | ६६९४ | ४० | १९ |
| १९ | यावल | यावल | १०४६३ | ६३ | ३२ |
| | | **एकूण क्वि.** | **१५४६०५** | **९३०** | **४५०** |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे धान्याची ट्रक आल्यानंतर धान्य गोदामात उतरवून घ्यावे. त्याचे Standardization करावे. WBNP एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गहू/तांदुळाच्या स्वतंत्र थप्प्या गोदामात लावण्यात याव्यात. तालुक्यात मंजूर नियतनापेक्षा जास्त नियतन आल्यास गोदाम व्यवस्थापक यांनी धान्य उतरवून घेवू नये, अन्यथा होणा-या परिणामास गोदाम व्यवस्थापक यांना जबाबदार धरण्यात येईल.डॅमेज चार्जेस त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल. गोदामातील धान्य वितरण करतांना प्रथम गोदामातील जूना साठा वितरीत करावा.जेणे करुन जुना धान्य साठा जास्त दिवस पडून खराब होणार नाही.किंवा त्यात तूट येणार नाही. वाहतूक प्रतीनिधी यांनी उपरोक्त नियतनाप्रमाणे तालुकानिहाय समप्रमाणात संपुर्ण धान्य पाठवावे. **तसेच नियमीतपणे उपयोगीता प्रमाणपत्र सादर करावे. धान्याची उचल मुदतीत पूर्ण करावी.**नियतन व्यपगत होणार नाही याची खबरदारी घ्यावी

WBNP एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा गहू/तांदुळ वरिल प्रकल्पांना स्वस्तधान्य दुकानामार्फत देण्यात यावे. तालुक्यात स्वस्तधान्य दुकानदार रजिस्टर ठेवून दुकानदारनिहाय नियतन प्रकल्पनिहाय देण्यात यावे. तसेच गोदामातील शिल्लक साठा विचारात घेवून स्वस्तधान्य दुकानदारांना परमीट देण्यात यावे. गोदामात धान्य शिल्लक नसतांना धान्याचे आगाऊ परमीट देण्यात येवू नये.एका योजनेतून दुस-या योजनेत धान्य वर्ग करावयाचे झाल्यास तसा प्रस्ताव मंजूरीसाठी इकडील कार्यालयात सादर करण्यात यावा. तसेच ज्यावेळेस योजनेतील धान्य भविष्यात प्राप्त होईल त्यावेळेस ते धान्य प्राधान्याने ज्या त्या योजनेत समायोजीत करण्यात यावे. धान्य आवक/वाटपाच्या नोंदी वेळचेवेळी नोदवहीत घेण्यात याव्यात. व तसा हिशोब अचुक ठेवण्यात यावा.

**माहे जुलै 2017 ते सप्टेंबर 2017** या दुसऱ्या तिमाही करिता केंद्र शासनाच्या गहु आधारित पोषण आहार योजनेअंतर्गत (ZP) नियतन **गहू 450 क्विं. डि.ओ क्रं 3589 व तांदूळ 930 क्विं. डि.ओ. 3590 दि. 29.08.2017** अन्वये वितरीत करणेत येत आहे.

स्वाक्षरीत/-
(किशोर राजे निंबाळकर)
**जिल्हाधिकारी जळगांव**

प्रत - .म.उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, नवीन प्रशासन भवन, 3रा मजला मंत्रालय, मुंबई 32 यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- म. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना , रायगड भवन (रिअर विंग),पहिला मजला, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई 400 614, यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतः- म. उप आयुक्त, (पुरवठा),नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतः- म.महिला बाल विकास अधिकारी, (बाल कल्याण विभाग ) जिल्हा परिषद , जळगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
**2/- सदर योजनेतील तालुकानिहाय धान्य उचल होत नाही, ते तात्काळ उचल होण्यासाठी संबंधीतांना सुचना व्हाव्यात.**

प्रतः- उप विभागीय अधिकारी, जळगांव, भुसावळ,फैजपूर,एरंडोल, अमळनेर, पाचोरा, चाळीसगांव यांना माहितीसाठी

प्रतः- तहसिलदार जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- बाल विकास प्रकल्प अधिकारी,एकात्मीक बाल विकास सेवा योजना-जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
2/-संबंधीत प्रकल्पातील बचत गट इ यांना तात्काळ धान्य उचल करुन घेण्याबाबत सुचीत करावे. व **100% नियतनानुसार धान्याची उचल करण्यात यावी तशी खात्री करण्यात यावी.**

प्रतः- गोदाम व्यवस्थापक/किपर/पुरवठा हिशोब अ.का. जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- व्यवस्थापक, भारतीय खाद्य निगम अंतर्गत एमएसडब्ल्यूसी जळगांव यांना माहितीसाठी रवाना

प्रतः- धान्य वाहतूक प्रतिनिधी जळगांव यांना माहितीसाठी रवाना.
2/-डी.ओ.निहाय दैनंदिन Statement II मध्ये माहिती दररोज या कार्यालयास सादर करण्यात यावी

प्रतः- मे.राज ट्रॅन्पोर्ट कं.लातूर, धान्य वाहतूक ठेकेदार यांना माहितीसाठी व मुदतीत धान्याची उचल करण्यासाठी रवाना.
2/-धान्याची उचल तात्काळ मुदतीत करण्यात यावी.धान्य व्यपगत केल्यास व्यपगत धान्याच्या बाजारभाव किमतीच्या 10% दंड रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.

(किशोर राजे निंबाळकर)
**जिल्हाधिकारी जळगांव**